## MATOSHREE VIMALABAI DESHMUKH MAHAVIDYALAYA, AMRAVATI

## INTERNAL QUALITY ASSURANCE CELL(IQAC)

### ANNUAL REPORT(2020-2021)

आमच्या महाविद्यालयात वरिष्ठ महाविद्यालयीन कलाशाखा,गृहविज्ञान शाखा आणि कायम विनाअनुदानित विज्ञानशाखा, कनिष्ठ महाविद्यालयीन कला,वाणिज्य,विज्ञान शाखा व एच.एस.सी. व्होकेशनल अंतर्गत तीन अभ्यासक्रम (फुड प्रॉडक्ट टेक्नॉलॉजी, मार्केटिंग अँण्ड रिटेल मॅनेजमेन्ट आणि मेडिकल लॅब टेक्निशियन) शिकवले जातात, या सर्व विभागात एकूण कायमस्वरुपी 65 शिक्षक व 15 शिक्षकेतर कर्मचारी 36 शिक्षक व 08 शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत, तसेच कायम विना अनुदानित अभ्यासक्रमाकरीत एकूण 22 शिक्षक आणि 05 शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

महाविद्यालयामध्ये समता मुलींचे वसतीगृह, स्वतंत्र व्यायामशाळा व जिम, 02 खुले मैदान, समृध्द ग्रंथालय, सुसज्ज प्रयोगशाळा, संगणकीय कार्यालय या सर्व बाबीचा समावेश आहे. महाविद्यालयामध्ये बहुसंख्येनी ग्रामिण विभागातील विद्यार्थी प्रवेश घेतात. महाविद्यालयामध्ये होणा-या नियमित तासिंकामुळे वार्षिक निकाल उत्कृष्ट असतो. महाविद्यालयाच्या गृहविज्ञान शाखेच्या स्थापने पासून आजपर्यंत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत विद्यार्थी स्थान प्राप्त करण्याची परंपरा कायम आहे.

**शैक्षणिक सत्र 2020-21 या वर्षात महाविद्यालयाच्या विविध शाखेतील प्रवेश निकालाची स्थिती खालील प्रमाणे आहे**

| अ.क | शाखा | वर्ग | प्रवेशीत विद्यार्थी संख्या | निकालाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | कला | बी ए भाग -1 | 120 | 97.92% |
| | | बी.ए भाग -2 | 63 | 100% |
| | | बी.ए भाग -3 | 64 | 90.48% |
| 2 | गृहविज्ञान | बी.एससीभाग-1 | 28 | 92.59% |
| | | बी एससी भाग -2 | 24 | 100% |
| | | बी एससी भाग -3 | 27 | 92.59% |
| 3 | विज्ञान | बी एससी भाग -1 | 82 | 97.26% |
| | | बी एससी भाग -2 | 91 | 100% |
| | | बी एससी भाग -3 | 137 | 38.52% |

Scanned with CamScanner

## 1) सांस्कृतिक समिती अहवाल 2020-21( Art, Music and Culture club )

प्रतिवर्षी सांस्कृतिक समिती अंतर्गत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारे आणि त्यांचा व्यक्तिमत्व विकास घडवून आणणारे विवीध उपक्रम महाविद्यालयाव्दारा घेतले जातात. 2020-21 या संपूर्ण सत्रात कोव्हीड-19 चा प्रभाव असल्याने महाविद्यालयात विद्यार्थ्यांना उपस्थित राहण्याची अनुमति नव्हता, त्यामूळे यावर्षी विद्यार्थी प्रत्यक्षरित्या सर्व उपक्रमात सहभागी होऊ शकले नाहीत. त्यामूळे अनेक कार्यक्रम आभासी पध्दतीने घेण्यात आले त्यालाही विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद दिला.परंतु महाविद्यालयाच्या परंपरेनुसार मान्यवरांच्या जयंती तसेच पुण्यतिथि,आणि इतर महत्वाचे दिवसांचे औचित्य साधुन **मा.प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख** यांच्या हस्ते प्रतिमांचे पूजन आणि हारार्पण करुन महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यानी आदरांजली वाहिली तसेच मान्यवरांकडून महापुरुषांच्या जीवनावर प्रकाश टाकला गेला.

दि 9 सप्टेंबर 2020 रोजी मातोश्री विमलाबाई देशमुख यांच्या पुण्यतिथिंनिमित्य महाविद्यालयात **डॉ.मंदा नांदुरकर** यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या **प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख** होत्या. सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी याप्रसंगी उपस्थित होते.

दि.27.12.2020 रोजी महाविद्यालयात डॉ.भाऊसाहेब देशमुख जयंतीचा कार्यक्रम घेण्यात आला या प्रसंगी **प्रा.ममता मस्की** यांचे डॉ.भाऊसाहेबांचे जीवनावर व्याख्यान संपन्न झाले. महाविद्यालयाच्या **प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख** अध्यक्षस्थानी होत्या. महाविद्यालयात सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी याप्रसंगी उपस्थिती दर्शविली.

दि.31 मार्च 2021 रोजी महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले. **श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे मा. सचिव श्री शेषरावजी खाडे** याप्रसंगी अध्यक्ष म्हणून लाभले होते. उनहाळी 2020 परिक्षेत गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा,मा.शेषरावजी खाडे,तसेच प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख यांचे हस्ते परितोषीक देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्य डॉ.छाया विधळे,विद्यार्थ्यांचे पालक,महा.शिक्षक आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन डॉ.मंदा नांदुरकर यांनी,तर आभार प्रदर्शन प्रा.साधना मोहोड यांनी केले.उपरोक्त कार्यक्रम घेताना कोव्हिड-19 च्या नियमावलीचे तंतोतंत पालन करण्यात आले.

दि.10 एप्रिल 2021 रोजी महाविद्यालयात श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे आद्य संस्थापक **शिक्षणमहर्षी डॉ.भाऊसाहेब देशमुख** यांच्या पुण्यतीथिनिमित्य त्याना आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान कार्यकारी प्राचार्य डॉ.छाया विधळे यांनी भूषविले.प्रा.सतिश माहोरे यांनी याप्रसंगी डॉ.भाऊसाहेब देशमुख यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकला.

Scanned with CamScanner

दि.14 एप्रिल 2021 रोजी **महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर** यांच्या जयंतीनिमित्य महाविद्यालयीन सांस्कृतिक समिती,रा.से.यो.आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने **"स्वातंत्र्याचा अमृत महोत्सवाच्या निमित्ताने"**यावर ज्येष्ठ साहीत्यिक **डॉ.सतीश तराळ** यांच्या व्याख्यानाचा online कार्यक्रम घेण्यात आला. महाविद्यालयातील शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रामुख्याने मोठया प्रमाणावर विद्यार्थी या कर्यक्रमात सहभागी झाले.

दि. 06 जुन 2021 रोजी, **"शिवराज्यभिषेक"** दिवसानिमित्त,महाराष्ट्रातील सुप्रसिध्द lady puppet show maker **श्रीमती दीपाली बाभुळकर,**यांच्या व्याख्यानाचा आणि पपेट शो चा online कार्यक्रम घेण्यात आला. श्रीमती दीपाली बाभुळकर यांनी आपल्या व्याख्यानातून शिवाजी महाराजांच्या पर्यावरणपूरक धोरणांची माहिती विशद केली. अध्यक्षस्थानी महा.कार्यकारी प्राचार्य डॉ.छाया विधळे होत्या. संचालन डॉ.मंदा नांदुरकर यांनी तर आभार प्रदर्शन प्रा.साधना माहोड यांनी केले.

दि.19.6.2021 रोजी वाचन दिनानिमित्य सुप्रसिध्द साहित्यिक **डॉ.शोभा रोकडे** यांच्या व्याख्यानाचा कार्यक्रम आभासी पध्दतीने घेण्यात आला.

सत्र 2020-21 मधील सर्व कर्यक्रम महाविद्यालयाच्या प्राचार्य मा.डॉ.संयोगिता देशमुख,तसेच कार्यकारी प्राचार्य मा. डॉ.छाया विधळे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समिती संयोजक प्रा.साधना मोहोड,सहसंयोजन प्रा.ममता मस्की तसेच सदस्य प्रा.डॉ.मंदा नांदुरकर, प्रा.प्राची भांबुरकर,प्रा.स्वाती वसू,प्रा.आदित्य गावंडे,प्रा.सतीश माहोरे, प्रा.गीता निर्वाण,प्रा.वंदना तिमाने यांनी विशेष परिश्रम घेतले.

**2) राष्ट्रीय छात्र सेना अहवाल :-**

महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेना युनिट मुलीकरिता असून 114 मुलींनी एन.सी.सी. मध्ये भाग घेतला.कॅप्टन डॉ.शालिनी वाटाणे हया एन.सी.सी अधिकारी आहेत.

- दि.21.06.20 ला आभासी माध्यमातून आंतरराष्ट्रीय योग दिवस घेण्यात आला.कॅडेटसनी घरुनच योगा ची विविध आसने केली.तसेच शेजारच्या लहान मुलांना विविध आसनाचे प्रात्याक्षिक दिले व योगा चे महत्व समजावून सांगितले.
- दि.26.7.2020 ला आभासी माध्यमातून वृक्षारोपण करण्यात आले एन.सी.सी.च्या 05 कॅडेटसनी विविध वृक्षांचे रोपण कले व काही कॅडेटसनी अपल्या शेजारील मुलांसोबत घराजवळील प्रागंणात विविध वृक्षांचे रोपण केले.
- दि.06.08.2020 ला आभसी माध्यमातून **"आत्मनिर्भर भारत"**कार्यक्रम घेण्यात आला, कॅडेटसनी रांगोळी स्पर्धे मध्ये रांगोळीच्या माध्यमातून भारताच्या आर्थिक स्थिती चे वर्णन केले. तसेच कॅडेट प्रतिक्षा मेटांगे हिने आत्मनिर्भर भारत अभियान घोषवाक्य स्पर्धेमध्ये भारतीय स्वदेशी वस्तु चा स्वीकार करणे हयावर घोषवाक्य तयार केले. कॅडेट

Scanned with CamScanner

अंबिका पंडया हिने आत्मनिर्भर भारत निबंध स्पर्धेमध्ये सहभाग घेतला. कॅडेट मनीषा भागवतकरनी आत्मनिर्भर भारत अभियान पोस्टर मेकींग स्पर्धेमध्ये पोस्टर तयार केले.

- दि.15.08.2020 ला आभासी माध्यमातून Fit India healthy India campaign कार्यक्रम घेण्यात आला. कॅडेट वैष्णवी महल्ले हिने गावातील लहान मुलांना Fit India healthy India campaingn अंतर्गत **"अब तुम्हारे हवाले वतन साथियो"** हे गीत शिकविले तसेच कॅडेट तक्षशिला वानखडे हिने गावातील लहान मुलांना Fit India healthy India अंतर्गत लहान मुला-मुलींना सायकल एक्टीव्हीटी कॅम्पेन मध्ये भाग घेतला.
- दि.26.11.2020 रोजी आभासी माध्यमातून **"संविधान दिवस"**घेण्यात आला. कॅडेटसनी "संविधान दिवस" वर कविता प्रस्तुत केली व संविधानावर निबंधाचे वाचन केले तसेच 21.11.2020 ला हिंदी विभाग, राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय,छात्र सेना व राज्यशास्त्र विभाग हयांच्या संययुक्त विद्यमाने "संविधान दिवस" महाविद्यालयात घेण्यात आला महाविद्यालयात प्राचार्य डॉ संयोगिता एस.देशमुख हयांच्या अध्यक्षतेत सर्व प्राध्यापकांनी उददेश पत्रिकेचे वाचन केले.तसेच संविधान दिवसाचे औचित्य साधून प्रश्नमंजूषेचे आयोजन ऑनलाईन केले व सहभागी विद्यार्थ्यांना ई-प्रमाणपत्र दिले.
- दि.01.12.2020 ते 15.12.2020 पर्यंत ऑफलाईन स्वच्छता अभियान पधरवाडा घेण्यात आला.दि.08.12.2020 ला राष्ट्रीय छात्र सेना कॅडेटसनी स्वच्छता अभियान अंतर्गत कॉलेज कॅम्पस मध्ये साफसफाई केली प्लास्टीक वेगळे करुन कचरा कचरापेटीत टाकला. दि.09.12.2020 ला स्वच्छता अभियान अंतर्गत हॅन्ड वॉश डे महाद्यालयातील क्लास रुम मध्ये घेण्यात आला.या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना हात धूण्याचे प्रशिक्षण दिले.
- दि.10.12.2020 ला स्वच्छता अभियान अंतर्गत शिव टेकडी पुढील पार्क ची साफसफाई केली दि.11.12.2020 ला स्वच्छता अभियान अंतर्गत पोस्टर मेकिंग स्पर्धेचे आयोजन महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आले.दि 12.12.2020 ला स्वच्छता अभियान अंतर्गत कॅडेटसनी शिवटेकडी येथे शिवाजी महाराजाच्या पूतळयाचे व चबुत-याची साफसफाई केली.
- दि.13.12.2020 ला **"प्लास्टीक वेस्ट मॅनेजमेंट द वे अहेड"** या विषयावर ऑनलाईन वेबिनार घेण्यात आला. हया वेबिनार च्या प्रमुख वक्त्या डॉ.कुमुद चौधरी मा.वि.दे.महा.हया होत्या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.संयोगिता देशमुख हयांच्या अध्यक्षतेत हा वेबिनार सपन्न झाला.

Scanned with CamScanner

3)राष्ट्रीय सेवा योजना :-

- राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत सन 2020-21 या सत्रात महावद्यालयात 50 मुले व 50 मुली असे एकूण 100 स्वयंसेवकांचे पथक कार्यरत आहे. आंतरराष्ट्रीय योगा दिवसाचे औचित्य लक्षात घेता महाविद्यालयातील सर्वांनी आभासी माध्यमातून योगा कार्यशाळेत सहभाग दिल.कोरोनाचे सावट व "घरी राहा स्वस्थ रहा" ही परिस्थिती लक्षात घेता प्रत्येकाने घरात राहून योगा केला **स्वस्थ रहा तंदुरुस्त रहा** असा संदेश यावेळी प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख मॅडम यांनी दिला .
- वर्षभर चालणा-या हिरवाई उपक्रमाअंतर्गत पर्यावरण रक्षण तसेच **झाडे लावा झाडे जगवा** हा संदेश देत अनेक उपक्रम राबवण्यात येतात,वृक्षारोपण कार्यक्रमात प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख यांच्या हस्ते महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या घराच्या परिसरात,वसाहतीमध्ये मोकळया जागेवर,सुरक्षित राहून वृक्षारोपण केले. महाविद्यालयात प्राध्यापक व शिक्षकेतर सहकारी यांचा उपस्थितीत सुरक्षित अंतर ठेवून वृक्षारोपण करण्यात आले.
- महाराष्ट्र शासनाच्या वृक्ष लागवड कार्यक्रमांतर्गत वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले."मी आणि माझं झाड" या सामाजिक उपक्रमाला विद्यार्थ्यांचा भरपूर प्रतिसाद मिळाला.
- ऑगष्ट 2020 ला राष्ट्रीय सेवा योजना नामांकनाला सुरवात झाली.
- 15 ऑगष्ट स्वातंत्र्यदिना निमित्त "वृक्ष संवर्धनाची जबाबदारी आपण उचलावी" ही उक्ती लक्षात घेऊन आभासी माध्यमातून आपल्या घरात असणा-या प्रत्येक झाडाची मी रक्षा करेल असे म्हणून झाडांना राखी बांधून **"वृक्ष रक्षाबंधन "** साजरे करण्यात आले.
- महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवक प्रथमेश गवई व तेजस्विनी साबळे या रासेयो स्वयंसेवकांनी बहुउददेशीय संस्था व्दारे कृषी उत्पन्न बाजार समती, येथे मास्क व सॅनिटायझर चे वाटप, त्यानंतर प्राथमिक आरोग्य केद्रात मास्क वाटप,कपिलवस्तू नगर, संत कबिर नगर,रमाबाई आंबेडकर नगर,विलास नगर,येथील भागात मास्क,सॅनेटाईझर चे वाटप,रासेयो स्वयंसेवक मार्फत तब्बल 1100 मास्क व 100 सेनेटायझर वाटप करण्यात आले. 5000 मास्क ची निर्मिती बहूउददेशीय संस्थे मार्फत करण्यात आलेली आहे. रासेयो स्वयंसेविका तेजस्विनी साबळे हया विद्यार्थीनीने सुध्दा मास्कचे स्वत:शिवण केलेले आहे. विविध ठिकाणी वाटप करण्याचं काम या संस्थे व्दारे होत आहे.
- श्री शिवाजी शिक्षण सस्था अमरावती व्दारा मराठी विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाने जागतिक मराठी भाषा दिवसाच्या निमित्ताने **घोषवाक्य स्पर्धेचे** आयोजन केले. कोरोनाचा वाढता प्रसार,संचारबंदी यामुळे आभासी कार्यक्रम घेण्यात आला. 27 फेब्रुवारी जागतिक मराठी भाषा दिवस मराठी कवी विष्णू वामन शिरवाडकर ऊर्फ

Scanned with CamScanner

कुसुमाग्रज यांच्या जन्मदिवसाच्या निमित्ताने हा दिवस मराठी भाषा दिवस म्हणून साजरा केला जातो. घोषवाक्य स्पर्धेला विद्यार्थ्यांनी उत्तम प्रदिसाद दिला. घोषवाक्य स्पर्धेमध्ये प्रतीक्षा खोब्रागडे,मेधा वाघाडे,सौरभ गेडाम,क्षितिज रसे,एस्तेर कांबळे,आचल भुयार वैष्णवी खानंदे,पल्लवी कुकडे,चेतन राऊत आरती बोरकर,साक्षी दुर्गे,करुणा मते, प्राजक्ता देशमुख,साक्षी जवंजाळकर,आनंद तायडे,राखी डहाके,अंजली म्हाला,या विद्यार्थ्यांनी उत्तम प्रतिसाद नोदवला **"मी मराठी" मराठी रुजवूया..माझा शब्द, माझे विचार माझा श्वास माझी स्फूर्ती माझ्या रक्तात मराठी,माझी माय मराठी !!** तर परदेशात वाजती मराठीचे चौघडे माराठीचे विश्व वसे जगती चोहीकडे मराठीचा बोलबाला असमंतात दुमदुमू.या सारख्या अनेक नाविन्यपूर्ण घोषवाक्यांनी विद्यार्थ्यांनी भरघोस प्रतिसाद दिला.

- जिल्हा एड्स व प्रतिबंध नियंत्रण कक्ष,जिल्हा सामान्य रुग्णालय अमरावती व मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने 01 डिसेंबर ते 07 डिसेंबर 2020 आंतरराष्ट्रीय एड्स सप्ताह साजरा करण्यात आला.आंतरराष्ट्रीय एड्स जनजागृती सप्ताह अंतर्गत अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले,राष्ट्रीय स्तरावरील प्रश्नमंजुषा चे आयोजन करण्यात आले. खुप चांगला प्रतिसाद या प्रश्नमंजूषा ला मिळाला ही प्रश्नमंजुषा महाविद्यालयाच्या प्राचार्याच्या मार्गदर्शनात तर जिल्हा एड्स नियंत्रण अधिकारी अजय साखरे तसेच डॉ राजेश बुरंगे संचालक राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती व डॉ.मंदा नांदुरकर जिल्हा समन्वयक .
- मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात 26 जानेवारी प्रजासत्ताक दिन कोरोना चे सावट आणि सामाजिक अंतराचे भान ठेवत साजरा करण्यात आला. या प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने प्राचार्य डॉ संयोगिता देशमुख मॅडम यांनी आपले विचार व्यक्त केले,कोरोना काळ,कोरोना नंतरची आव्हाने,नवीन शैक्षणिक धोरण,शेतक-यांच्या समस्या यावर प्रकाश टाकून उदात्त ध्येयासाठी केलेले कोणतेही बलिदान वाया जात नाही असे विचार मांडले.यावेळी सर्व प्राध्यापक वृंद उपस्थित होते.डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन महाविद्यालय मलांचे,डॉ.पंजाबराव देशमुख तंत्रनिकेतन मुर्लीचे,स्वतंत्र कनिष्ठ महाविद्यालय, कृषी विद्याशाखा रुरल परिसरातील,प्राचर्य,प्राध्यापक,शिक्षकेतर सहकारी तसेच मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयातील वरिष्ट,कनिष्ठ,एचएससी व्होकेशनल प्राध्यापक व शिक्षकेतर सहकारी उपस्थित होते. राष्ट्रीय छात्र सेना आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी उपस्थित होते. शारीरिक शिक्षण ससंचालक प्रा.विलास ठाकरे,संचालक शारीरिक शिक्षण यांच्या आयोजनात प्रजासत्ताक दिन संपन्न झाला.यावेळी **उददेश पत्रिकेचे वाचन** डॉ मंदा नांदुरकर यांनी केले सामाजिक अंतराचे भान ठेवत सर्वांच्या उपस्थितीत प्रजासत्ताक दिन संपन्न झाला.

Scanned with CamScanner

- 02 ऑक्टोबर 2020 महात्मा गांधी जयंती व लालबहाददुर जयंतीचे औचित्य साधून महाविद्यालयात प्रतिमेचे पूजन करण्यात आले."**स्वच्छता हीच सेवा**" या अंतर्गत आभासी माध्यमातून निबंध स्पर्धा चित्रकला या सारख्या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

- 31 ऑक्टोबर रोजी सरदार वल्लभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय एकता दिवस साजरा करण्यात आला एकतेची शपथ सामाजिक अंतराचे भान ठेवत महाविद्यालयातील प्राध्यापक वृंद यांना डॉ मंदा नांदुरकर यांनी एकात्मतेची शपथ दिली.
- 23 एप्रिल 2021 ला जागतिक ग्रथ दिनाचे औचित्य साधून मराठी विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "मला आवडलेले पुस्तक" आभासी उपक्रम घेण्यात आला, या उपक्रमात विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय सहभाग नोदवला. "मला आवडलेले पुस्तक" मध्ये अंजली म्हाला,कुणाल कमलापुरे,अर्षद खान,प्राजक्ता,साक्षी दुर्गे,साक्षी बाहेकर,साक्षी जंजाळकर,वैष्णवी काकडे,नयना सूर्यवंशी,जयश्री शिरभाते या विद्यर्थ्यांनी उस्फूर्त प्रतिसाद नोदवला.मृदगंध,श्यामची आई,सिक्रेट ऑफ लाईफ अशा विविध पुस्तकांवर चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांनी त्यांना आवडलेले पुस्तक यावर आपले मत व्यक्त केले. पुस्तके आपल्याला प्रेरणा देतात. आपल्या संग्रही अधिकाधिक पुस्तके असायला हवीत असे मत डॉ.मंदा नांदुरकर यांनी व्यक्त केले. कार्यकारी प्राचार्य डॉ.छाया विधळे यांच्या मार्गदर्शनात "मला आवडलेले पुस्तक" हा आभासी उपक्रम घेण्यात आला.

- 23 एप्रिल जागतिक ग्रंथ दिवस, जागप्रसिध्द नाटककार विल्यम शेक्सपियर यांचा जन्मदिवस म्हणून पुस्तक दिवस साजरा केल्या जातो. मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात हा दिवस आभसी माध्यमातून साजरा करण्यात आला. जिजाऊ जयंती व स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने माझी वसुंधरा अभियानांतर्गत पर्यावरण रक्षणाच्या अनुषंगाने हरित शपथ घेण्यात आली. महाविद्यालयातील वरिष्ठ,कनिष्ठ तसेच एच एस सी होकेशनल विभागाचे सर्व प्राध्यापक वृंद व शिक्षकेतर सहकारी, तसेच विद्यर्थी हरित शपथ मध्ये सहभागी होते. हिरवाई अंतर्गत माझी वसुंधरा हे अभियान महाविद्यालयात राबविण्यात येणार आहे. या देशाला, वसुंधरेला स्वच्छ सुंदर करण्यासाठी आणि प्रदूषण मुक्त करण्यासाठी अधिक प्रयत्न करू या अशी शपथ घेण्यात आली.प्राचार्य संयोगिता देशमुख यांच्या मार्गदर्शनात व उपस्थितित सर्वानी प्रतिज्ञा घेतली. प्रतिज्ञा चे वाचन डॉ.मंदा नांदुरकर,राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी यांनी केली. डॉ.मंगेश देशमुख राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकरी प्रा.साधना मोहोड,सांस्कृतिक समिती संयोजक,महाविद्यालयातील प्राध्यापक,शिक्षकेतर सहकारी तसेच विद्यार्थी उत्स्फूर्तपणे या कार्यक्रमात सहभागी होते.

Scanned with CamScanner

**"रक्तदान सर्वश्रेष्ठ दान" :-**

श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती,राष्ट्रीय सेवा योजना,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान,डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय संयुक्त विद्यमाने आयोजित रक्तदान शिबिरात, **श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावतीचे अध्यक्ष मा.हर्षवर्धनजी देशमुख साहेब, श्री दिलीप बाबू इंगोले,उपाध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती ,श्री शेषरावजी खाडे,सचिव श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती,डॉ.ए.टी.देशमुख,अधिष्ठाता डॉ पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय अमरावती,डॉ.संयोगिता देशमुख,प्राचार्य मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती,**डॉ.राजेश बुरंगे,संचालक,राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती, **डॉ.स्मिता देशमुख,प्राचार्य श्री शिवाजी कला वाणिज्य महाविद्यालय अमरावती,** डॉ मंदा नांदुरकर जिल्हा समस्न्वयक अमरावती, डॉ.मंगेश देशमुख, कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात 68 रक्तदात्यांनी रक्तदान केले रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देण्यात आले.प्रा.विलास ठाकरे, डॉ.मंगेश देशमुख,प्रा.स्वाती वसू यांनी रक्तदान केले.रक्तदान शिबिराला उस्फुर्त प्रतिसाद होता.

**स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने:-**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या 130 व्या जयंतीनिमित्त भारतीय सातंत्र्याच्या अमृत महोत्सवाच्या निमित्ताने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले समारंभाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या नवनियक्त प्रभारी प्राचार्य डॉ.छाया विधळे होत्या.डॉ.सतीश तराळ प्रमुख वक्त म्हणुन उपस्थित होते.आपल्या विचारातून त्यांनी महात्मा गांधी व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या बददल सविस्तर माहिती सांगून समकालीन असणा-या या दोन महापुरुषांच्या मध्ये मतभिन्नता असली तरी एकमेकांबददल आदर होता व त्यांचे कार्य परस्पर पूरक होते.दोघांचेही कार्यकर्तृत्व केवळ राष्ट्रीय पातळीवरच नव्हे तर वैश्विक पातळीवर महत्वाचे असल्याचे प्रतिपादन विविध घटना व प्रसंगा व्दारे केले. प्राचार्य डॉ छाया विधळे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात भारतीय स्वातंत्र्याचा इतिहास सांगून गांधी किंवा आंबेडकर यांचे कार्य मौलिक असल्याचे सविस्तर प्रतिपादन केले. या कार्यक्रमाचे आयोजन मराठी विभाग,राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ.मंदा नांदुरकर यांनी केले तर आभार प्रदर्शन सांस्कृतिक समिती समन्वयक प्रा.साधना माहोड यांनी केले. विद्यार्थी,प्राध्यापक,शिक्षकेतर सहकारी,रसिक यांनी कार्यक्रमाचा लाभ घेतला.डॉ.एस.डी.ठाकरे,प्रा.गीता निर्वाण,अमोल गुडधे,प्रा.जे.डी सांगोडे,डॉ शर्मिला कुबडे,डॉ कुमुदिनी चौधरी यांच्या सह साक्षी दुर्गे,कुणाल कमलापुरे,प्राजक्ता,राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता .

Scanned with CamScanner

**कोव्हीड-19" योग आणि आरोग्य" आंतरराष्ट्रीय वेबिनार :-**

21 जून आंतरराष्ट्रीय योग दिनानिमित्त महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय वेबिनार चे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय छात्र सेना आणि संत गाडगे बाब अमरावती विद्यापीठ अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने आतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. आंतरराष्ट्रीय वेबिनारचा विषय कोव्हीड-19, योग आणि आरोग्य असा होता. या आंतराष्ट्रीय वेबिनारचे **उद्घाट श्री शेषरावजी खाडे सचिव,श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती** हे होते व या आंतराष्ट्रीय वेबिनारच्या अध्यक्ष महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ.छाया विघळे हया होत्या तर प्रमुख वक्ते म्हणून डॉ इंडिका, कोलंबो विद्यापीठ,श्रीलंका तर दुसरे वक्ते श्री स्टीव्ह योगा फेडरेशन हे उपस्थित होते. बीजभाषक माजी प्राचार्य,हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती येथील डॉ.अरुण खोडस्कर उपस्थित होते.डॉ राजेश बुरंगे संचालक,राष्ट्रीय सेवा योजना,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावी हे विशेष निमंत्रीत होते.प्रमुख वक्ते डॉ.इंडिका यांनी प्रतिकारक्षमता वाढवण्यासाठी शरीराच्या तंदुरुस्तीसाठी योगा कसा अत्यावश्यक आहे हे विविध उदाहरणे देऊन पटवून दिले.डॉ.राजेश बुरंगे संचालक राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ यांनी वेबानार घेण्यामागचा उददेश विशद केला आणि योगा करताना कोणत्या गोष्टीची काळजी घ्यायला हवी, उत्कृष्ट जीवन शैली करता योगाचा समावेश आपल्या आयुष्यात कसा महत्वपूर्ण आहे यावर प्रकाश टाकला. श्री स्टिव्ह यांनी योगा हा दैनंदिन जीवनासाठी तसेच मन:शांतीसाठी अतिशय महत्वपूर्ण आहे हे सुध्दा पटवून दिले.आंतरराष्ट्रीय वेबीनार च्या अध्यक्ष प्राचार्य डॉ.छाया विधळे यांनी "योगा असे जिथे..आरोग्य वसे तिथे" ही संकल्पना विशद केली.योग ही आपल्या संस्कृतीची अमूल्य धरोहर आहे. योगा मध्ये विविध प्रकारचा अभ्यास आणि पध्दती समाविष्ट आहेत योगासनं केल्यामुळे आरोग्य निरोगी राहते असे विचार व्यक्त करुन आपल्या अध्यक्षीय मनोगतातून प्रमुख वक्ते,बीज भाषक व निमत्रितांच्या विचारांचा वेध घेतला. या आंतरराष्ट्रीय वेबिनारला प्राध्यापक वृंद विद्यार्थी तसेच शिक्षकेतर सहकारी प्रामुख्याने उपस्थित होते. या वेबिनारचे संचालन आंतराष्ट्रीय वेबिनार च्या संयोजक डॉ.मंदा नांदुरकर राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक यांनी तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय छात्र सेना अधिकारी कॅप्टन शालिनी वाटाणे यांनी केले.या वेबीनारला प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर सहकारी व विद्यार्थी यांचा उस्फुर्त प्रतिसाद होता.

**4) स्तनपान व पोषण सप्ताह :-**

मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात IQAC अंतर्गत अन्न व पोषण विभाग व गृहअर्थशास्त्र विभागाव्दारे स्तनपान सप्ताह व पोषण सप्ताह आयोजित करण्यात येतो कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे यावर्षी सर्व स्पर्धा ऑनलाइन पध्दतीने घेण्यात आल्या .

स्तनपान सप्ताह 2020 मध्ये अन्न व पोषण विभागातर्फे दि 01 ऑगष्ट ते 7 ऑगष्ट 2020 या सप्ताहात आंतरमहाविद्यालयीन विविध स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या त्यात एकूण 35 विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता त्यात

Scanned with CamScanner

पुसद, अकोला , महिला महाविद्यालय अमरावती व अमरावती विद्यापीठ मधील विद्यार्थी सहभागी होते. या सर्वांना e-Certificate देण्यात आले आणि प्रत्येक स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेल्या विद्यार्थ्याला 101 रु रोख रक्कम देण्यात आली .

**प्रथम क्रमांक येणा-यांची यादी:-**

निबंध स्पर्धा -योगिता लांजेवार, बी एस.सी भाग-3

ग्रीटिंग स्पर्धा - धनश्री मोहोड , बी एस.सी भाग-3

रागोळी स्पर्धा - वेदिका चर्जन, एम एससी (अन्नशास्त्र)

पाककला स्पर्धा - योगिता लांजेवार, बी एस.सी भाग-3

अन्न व पोषण विभागातर्फे दि 01 सप्टेबर ते 7 सप्टेबर 2020 मध्ये पोषण सप्ताह साजरा करण्यात आला. या वर्षी या विभागातर्फे ऑनलाईन स्पर्धा आयोजित केल्या होत्या. त्यात एकूण 30 विद्यार्थ्यींनी स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या या सर्वाना e- Certificate देण्यात आले व प्रथम येणा-यास 101 रु रोख देण्यात आले.

**खाली प्रथम क्रमांक येणा-यांची यादी:-**

एक मिनिट स्पर्धा - कु.तेजस्विनी सगने , बी एससी भाग-1

थाळी सजावट स्पर्धा - कु.योगिता लांजेवार, बी एससी भाग-3

दागिने बनविणे स्पर्धा - कु.कोमल रुईकर, बी एससी भाग-1

रांगोळी स्पर्धा - कु तेजस्विनी सगने, बी एससी भाग-1

प्रश्न मंजुषा स्पर्धा - यात सगळेच स्पर्धक विजयी झाले त्यानी e- Certificate देण्यात आले.

मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयात दिनांक 01 ऑगष्ट ते 07 ऑगष्ट 2021 या जागतिक स्तनपान सप्ताहात पोस्टर स्पर्धा,निबंध स्पर्धा आयोजित केली होती तसेच दि 07 ऑगष्ट 2021 शनिवार रोजी विद्यार्थ्यांना व्हिडिओ मार्फत स्तनपानाचे महत्व व फायदे याबददलची माहिती देण्यात आली होती. नवसारी जवळ पारधी लोकांच्या पाडयावर जाऊन तेथील स्तनदा मातांना स्वच्छते बददल,आहाराबददल व स्तनपानाची शास्त्रीय माहिती यावर प्राध्यापक डॉ कुबडे यानी मार्गदर्शन केले तसेच महाविद्यालयाच्या वतीने मुलांना व मातांना नाश्त्याचे वाटप,कपडे वाटप स्वच्छते करीता ब्रश,पेस्ट आणि साबण यांचे वाटप करण्यात आले.स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थ्यांना e-Certificate दिले व प्रथम क्रमांक प्राप्त करणा-याना प्रमाणपत्र व 101 रु.रोख परितोषिक देण्यात आले.

**5) संविधान साक्षरता व जनजागृती :-**

राष्ट्रीय सेवा योजना,राष्ट्रीय छात्र सेना,हिंदी व मराठी विभागाच्या वतीन 26.11.2020 रोजी ऑनलाईन प्रश्न मंजुषेचे आयोजन करण्यात आले,त्या मध्ये उददेशपत्रिकेचे वाचन करण्यात आले.

Scanned with CamScanner

**6)वसा सेवाभावाचा :-**

मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय व संत गाडगे बाबा जेष्ठ नागरीक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने नवसारी परिसरातील आदिवासी वस्तीवर जिवनावश्यक वस्तुचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांत महाविद्यालयातील विवीध विभागाव्दारा पुढील उपकृम राबविण्यात आले.

1) जीवनावश्यक वस्तुंचे वाटप,2) कपडे व पोषक खाद्यपदार्थाचे वाटप,3)आहार, आरोग्य याबाबत मार्गदर्शन, 4)कोवीड जनजागृती,5) वृक्षारोपण.

या सर्व उपक्रमामध्ये महाविद्यालयातील डॉ.एस आर कुबडे, प्रा.एस.एस.मोहोड, प्रा.ए पी हरणे, डॉ.के ई चौधरी, प्रा.पी.बी.भांबुरकर, डॉ.एस डी ठाकरे, डॉ.एम एम नांदुरकर, डॉ एस बी देशमुख, यांनी सहभाग घेतला. महाविद्यालयाच्या कार्यकारी प्राचार्य डॉ सी एन विधळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पुर्ण करण्यात आला. विद्यादानाबरोबरच सामाजीक बांधीलकी आणि सेवाभावी वृत्ती जोपासली जावी या उददेशाने हा उपक्रम राबवीला गेला.

**7)मातोश्री विमलाबाई देशमुख अन्नपूर्णा योजना :-**

मातोश्री विमलाबाई देशमुख अन्नपुर्णा योजना,श्री शिवाजी शिक्षण संस्था व्दारा संचलित, डॉ पंजाबराव देशमुख वैद्यकिय महाविद्यालय,अमरावती येथील रुग्णांना संस्थे अंतर्गत विविध शाळा व महाविद्यालयीन शिक्षकांतर्फे मोफत भोजन वाटप केले जाते.

या उपक्रमाची सुरवात सत्र 2019-20 मध्ये या महाविद्यालयाच्या पुढाकाराने झाली. सत्र 2021-22 मध्ये एकुण रु.34800/- महाविद्यालयाच्या वतीने या योजनेत योगदान देण्यात आले. तसेच योजनेचे संस्थापक सदस्य म्हणुन श्री शिवाजी शिक्षण संस्थंअंतर्गत कार्यरत असणा-या 78 शाळा व 19 महाविद्यालयाशी या संबंधीत पत्र व्यवहार करण्यात आला. तसेच त्याचा रीतसर अहवाल संस्थेकडे पाठविण्यात आला.

**8) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वेबीनार:-**

दि.15 मे 2020 ला "कोविड-19 जनजागृती" या राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. प्रमुख वक्ते म्हणून डॉ प्रफल्ल कडू सुप्रसिध्द हृदयरोगतज्ञ,योगतज्ञ डॉ अरुण खोडस्कर माजी प्राचार्य हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ अमरावती तसेच डॉ हर्षीता टी,धारवाड विद्यापीठ,कर्नाटक व दिपाली भैसे ,आहारतज्ञ उपस्थित होते.कोविड चे सावट व आरोग्य लक्षात घेता या वेबिनारचे आयोजन प्राचायर्प डॉ.संयोगिता देशमुख यांच्या मार्गदर्शनात डॉ स्मिता ठाकरे, इंग्रजी विभाग प्रमुख,डॉ मंदा नांदुरकर मराठी विभाग व रासेयो जिल्हा समन्वयक यांच्या सहयोगाने संपन्न झाले.

दि.17 मे 2020 ला काविडचा मानव समुदायावर होणरा परीणाम या विषयावर आधारित आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन करण्यात आले. या वेबिनारला **अध्यक्ष म्हणून मा.श्री हर्षवर्धनजी देशमुख,अध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती तसेच मा श्री हेमंतजी काळमेघ, कार्यकारी सदस्य श्री शिवाजी शिक्षण संस्था,अमरावती ,**

Scanned with CamScanner

बीजभाषक डॉ .उधाल प्यारे क्युरेल काठमांडू विद्यापीठ,नेपाळ, डॉ श्रीकांत झा,श्री आशुतोष,डॉ.अरविंद लुहार या प्रमुख वक्त्यांचा सहभाग होता. प्राचार्य डॉ.संयोगिता देशमुख यांच्या नेतृत्वात डॉ.स्मिता ठाकरे इंग्रजी विभागप्रमुख व डॉ. मंदा नांदुरकर मराठी विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना जिल्हा समन्वयक यांच्या आयोजनात कार्यक्रम संपन्न झाला.

दि. 11 जून 2021 ला "आरोग्यम धनसंपदा" आपले आरोग्य आपल्या हातात लक्षात घेता आंतरराष्ट्रीय योगदिनाचे औचित्य साधून Covid-19 Health,Yoga या आंतरराष्ट्रीय वेबीनारचे आयोजन रासेयो संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने करण्या आले. अध्यक्ष म्हणून **श्री शेषराव खाडे,सचिव श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावती** हे होते.बीज भाषक डॉ.अरुण खोडस्कर,योग गुरु, माजी प्राचार्य डॉ.इंडिका,कोलंबो विद्यापीठ, योगा असोसिएशन सेशल हे प्रमुख होते. प्राचार्य डॉ छाया विधळे यांच्या मार्गदर्शनात या आंतरराष्ट्रीय वेबिनारचे आयोजन, डॉ.मंदा नांदुरकर राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी व जिल्हा समन्वयक यांच्या सहयोगाने सपन्न झाला.

**9) आय पी आर वर्कशॉप :-**

इंगजी विभाग व्दारा 19 मार्च 2021 रोजी आभासी पध्दतीने आयोजीत केला गेला डॉ वैशाली चौखंडे,विभाग प्रमुख,लायब्ररी सायन्य,संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,अमरावती यांचे मार्गदर्शन कार्यक्रमास लाभले.

**10) ॲड ऑन कोर्स:-**

सत्र 2020-21 मध्ये महाविद्यालयातील विविध विभागा व्दारे पुढील पाच सर्टीफिकेट कोर्सेस राबविण्यात आले.

- English Grammar & Communication Skill- Dr.S.D.Thakare
- Flower Arrangement- Ms.P.B.Bhamburkar
- Kasuti Embroidery & its Application -Mrs.A P Harne
- Fruit & Vagetable preservation--Dr.S R Kubde
- Management of natural Resources-Dr.K E Choudhary

**11)भित्तीपत्रक :-**

महाविद्यालयातील प्रत्येक विभागाव्दारा प्रतिवर्षी हा उपक्रम राबविला जातो.दिलेल्या वेळापत्रकानुसार प्रत्येक महिन्यात चार विभागाचे भित्तीपत्रक प्रदर्शिन केले जाते. या उपक्रमाच्या माध्यमातुन विद्यार्थ्यामध्ये विषयाची आवड,माहिती, कल्पकता,सादरीकरण, कौशल्य निर्माण होते.

Scanned with CamScanner

**12) ग्रंथालय विभाग व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ :-**

हे दोन्ही विभाग डॉ.मंगेश देशमुख (ग्रंथपाल) सांभाळतात शिक्षक व विद्यार्थ्यांना नविन विषयावरील वाचनाची संधी महाविद्यालयाच्या सुसज्ज ग्रथालयाव्दारा उपलब्ध करुन दिले जाते प्रतिवर्षि ग्रथालयाच्या ग्रथसंपदेत दर्जेदार ग्रंथ, नियतकालिक,संदर्भग्रंथ,आदिची भर टाकली जाते. आजमीतीस ग्रथालयामध्ये 26508 ग्रथसंपदा असून 2245 संदर्भ ग्रथ, 16 नियतकालिके,09 वृत्तपत्रे,लधुशोध प्रकल्प, ग्रंथसुची उपलब्ध आहेत.

